CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

u RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

## सुमन पाटील, रोहित पाटलांचं उपोषण स्थगित!

**सांगली ।** सांगली टेंभू पाणी योजनेच्या विस्तारीकरणासंबंधित राज्य सरकारने दिलेल्या लेखी आश्वासनानंतर आमदार सुमनताई पाटील आणि रोहित पाटील यांनी आमरण उपोषण स्थगित केलं आहे. आश्वासनाप्रमाणे जर एक महिन्यात काम सुरू नाही झालं तर मंत्रालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला. जेष्ठ स्वातंत्र्यसैनिकाच्या हस्ते सुमनताई पाटील आणि रोहित पाटील यांनी उपोषण सोडले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे आमदार अनिल बाबर आणि सांगलीचे जिल्हाधिकारी यावेळी उपस्थित होते.



धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : ३३८ वा | बुधवार दि. ४ ऑक्टोबर २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## न्यूज कॉलम

### झाडावरून पडून तरुणाचा मृत्यू

**धुळे ।** बकऱ्यांसाठी झाडावर चढलेल्या तरुणाचा खाडी पडून मृत्यू झाला. तुषार सुनील पाटील (वय २२, रा. बोरकुंड ता. धुळे) असे मृताचे नाव आहे. तो २८ सप्टेंबरला दुपारी बोरकुंड शिवारात बकर्यांसाठी चारा तोडण्याकरिता झाडावर चढला. फांदीवरून पाय घसरल्याने तो खाली पडला. त्यात गंभीर जखमी झाला. त्याला बोरकुंड प्रामिक आरोग्य केंद्रात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

### सहा बैलांना पोलिसांकडून जीवदान

**शिंदखेडा ।** पिकअप वाहनातून निर्दयपणे कत्तलीसाठी होणारी बैलांची वाहतूक नरडाणा पोलिसांनी रोखली. वाहनातील सहा बैलांची सुटका केली. याप्रकरणी वाहनचालकावर गुन्हा दाखल केला. पोलिसांनी गव्हाणे (ता. शिंदखडा) शिवारात पिकअपला (एमएच १८ बीजी, ८१८३) पकडले. चालक पसार झाला. वाहनाच्या तपासणीत खिलारी जातीचे सहा बैल क्रूरतेने बांधलेले आढळले. ६४ हजारांचे बैल व ४५ हजारांचे वाहन असा एक लाख नऊ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. महेश चव्हाण यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला.

# एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस अचानक दिल्लीला झाले रवाना

### पवार यांच्या नाराजीमुळे दिल्ली गाठल्याची राजकीय वर्तुळात चर्चा

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वाची बातमी समोर आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नाराजीच्या चर्चा सुरु असतानाच आज पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ते गैरहजर राहिले. त्यामुळे अजित पवार यांच्या नाराजीच्या चर्चांना आणखी उधाण आलं. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर त्यांनी अजित पवार यांच्या गैरहजेरीबद्दल प्रतिक्रिया दिली. अजित पवार यांची तब्येत बरी नसल्यामुळे ते बैठकीला येऊ शकले नाहीत, असं एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. पण राजकीय वर्तुळात एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यात नाराजी असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहेत. याच सगळ्या घडामोडींदरम्यान आणखी एक मोठी घडामोड घडत आहेत.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अचानक दिल्लीला रवाना झाले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही नेते वरिष्ठांच्या भेटीसाठी दिल्लीला रवाना झाले आहेत. राज्यातील सध्याच्या राजकीय परिस्थितीमुळे या भेटीला जास्त महत्त्व प्राप्त झालंय. विशेष म्हणजे अजित पवार हे आजच्या मंत्रिमंडळ बैठकीला हजर राहिले नाहीत. तसेच ते दिल्लीला देखील वरिष्ठांच्या भेटीसाठी गेलेले नाहीत. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात पडद्यामागे काय घडतंय? याबाबतचा सस्पेन्स वाढला आहे. सत्ताधारी पक्षांमध्ये सध्या सारं काही आलबेल नाही, अशी चर्चा रंगताना दिसत आहेत. अजित पवार यांच्याकडून बैठकांच्या धडाका सुरु असल्यामुळे पुण्यातील भाजप नेत्यांमध्ये अस्वस्थता वाढली होती. पुण्याचं पालकमंत्रीपद भाजपकडे आहे. भाजप नेते चंद्रकांत पाटील हे पुण्याचे पालकमंत्री आहेत. पण अजित पवार हे पुण्याच्या पालकमंत्रीपदासाठी आग्रही आहेत. याशिवाय इतर जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदावरुनही सत्ताधारी पक्षांमध्ये धुसफूस असल्याची चर्चा आहे. अनेक आमदार नाराज आहेत. त्यामुळे शिंदे-फडणवीस दिल्लीतील वरिष्ठांकडे आपापल्या आमदारांची भूमिका मांडण्याची शक्यता आहे. अजित पवार सत्तेत सहभागी झाले तेव्हाच शिंदे गटात धुसफूस सुरु झाली होती. अजित पवार यांचा गट सत्तेत सहभागी झाल्याने मंत्रिमंडळ विस्तारात आणखी एक वाटेकरी निर्माण झाला. त्यामुळे अजित पवार यांच्या गटाच्या नेत्यांसाठी देखील मंत्रिपदं देण्यात आली. यावेळी शिंदे आणि भाजपकडील काही महत्त्वाची खाते अजित पवार यांच्या गटाला मिळाली. अजित पवार यांना स्वत:ला अर्थ खातं मिळालं. याशिवाय त्यांच्या गटाला शिंदे गटाकडे असणारं कृषी खातं मिळालं. यावरुन बरीच चर्चा सुरु होती.



### भेटीमागे दादांच्या नाराजीचा सूर

**महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वाची बातमी समोर आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नाराजीच्या चर्चा सुरु असतानाच आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत ते गैरहजर राहिले. त्यामुळे दादांच्या नाराजीच्या चर्चांना राजकीय वर्तुळात अधिक चर्चा होऊ लागल्या. दरम्यान, मुख्यमंत्र्यांनी अजित पवार आजारी असल्याचे सांगितले. पण एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यात गेल्या काही दिवसांपासून म्हणावं तस सौख्य नसल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहेत. याच सगळ्या घडामोडींदरम्यान काही वेळापूर्वीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीला रवाना झाले आहेत. ते वरिष्ठांच्या भेटीसाठी गेल्याचे सांगितले जात आहे.**

### बैठकीला दादांची गैरहजेरी

**गेल्या काही दिवसांपासून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे नाराज असल्याची चर्चा आहे. आजच्या राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीलाही ते उपस्थित राहिले नव्हते. राज्याचा रखडलेला मंत्रिमंडळाचा विस्तार आणि पालकमंत्रीपदाचा अद्याप न सुटलेला पेच यावरून राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिंदे-फडणवीसांवर मोठा दबाव असल्याची चर्चा आहे. त्याचमुळे आता हे दोन्ही नेते दिल्लीला गेलेत की काय अशी चर्चा आहे. कारण राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यासाठी केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा करणे गरजेचं आहे.**

### कार्यक्रम आटोपून फडणवीस निघाले

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे भाजपच्या एका कार्यक्रमात होते, पण वेळेआधीच त्यांनी समारोपाचे भाषण केले आणि तातडीने ते दिल्लीला रवाना झाले. त्यामुळे दिल्लीत नेमकं महाराष्ट्राच्या राजकारणात शिजतय तरी काय, असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.**

### राष्ट्रवादीकडून दबाव असल्याची चर्चा

**गेल्या काही दिवसांपासून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे नाराज असल्याची चर्चा आहे. आजच्या राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीलाही ते उपस्थित राहिले नव्हते. राज्याचा रखडलेला मंत्रिमंडळाचा विस्तार आणि पालकमंत्रीपदाचा अद्याप न सुटलेला पेच यावरून राष्ट्रवादी काँग्रेसकडून शिंदे-फडणवीसांवर मोठा दबाव असल्याची चर्चा आहे.**

# भाजपने आपल्यासोबत राहणाऱ्यांविरोधात फिल्डिंग लावायचे धंदे बंद करावेत

### बच्चू कडूंचा हल्लाबोल

**अकोला । प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील सत्तासंघर्षात मंत्रिपद आणि उद्धव ठाकरे यांची साथ सोडून एकनाथ शिंदे यांच्या गटासोबत असलेले प्रहार जनशक्तीचे आमदार बच्चू कडू यांनी आता भाजपवरच हल्लाबोल केला आहे. भाजपने आपल्यासोबत उभं राहणाऱ्यांची फिल्डिंग लावण्याचे धंदे बंद करावेत, असा थेट हल्लाबोल बच्चू कडू यांनी केला आहे. काँग्रेसआणि इतर पक्षांकडून जेवढा त्रास होत नाही तेवढा त्रास भाजपकडून होत असल्याचा आरोप त्यांनी केला.

'प्रहार जनशक्ती पक्षा'चे अध्यक्ष आमदार बच्चू कडूंनी अकोल्यात भाजपवर गंभीर आरोप केला आहे. आपल्या मतदारसंघात भाजप आपल्याला त्रास देत असल्याचा आरोप बच्चू कडूंनी भाजपवर केला आहे. आपल्या मतदारसंघात काँग्रेस आणि इतर पक्षांचा आपल्याला त्रास नाही. मात्र, भाजपचं आपल्याला त्रास देत असल्याचा खळबळजनक आरोप कडूंनी भाजपवर केला. मात्र, आपण त्याची काळजी करत नसल्याचं बच्चू कडूंनी ठणकावले आहे. आपल्याला त्रास देण्यासाठी भाजपनं आणखी दोन आमदार, तीन खासदार लावावेत असा टोलाही त्यांनी भाजपला लगावला आहे. याला आपण घाबरणार नसल्याचे ही बच्चू कडू यांनी म्हटले. भाजपनं मैत्री करताना आणि मित्रत्व निभावतांना ते सर्वच प्रकारे निभवावं. फक्त कामापुरतं वापरून फेकून द्यावं, असं करू नये असंही बच्चू कडू यांनी म्हटले. भाजपनं आपल्याच सोबत राहणाऱ्यांची फील्डिंग लावायचे धंदे बंद करावेत असा इशाराही त्यांनी यावेळी दिला आहे. गेल्या काही काळात बच्चू कडू यांचा खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्याशी वाद चांगलाच गाजला होता. याला भाजपचं समर्थन असल्याचा त्यांचा आरोप आहे. मागील काही काळात भाजपने अमरावती जिल्ह्यात पक्षाची पकड मजबूत करण्यासाठी जोर लावला आहे. अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा या २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी-काँग्रेस आघाडीच्या पाठिंब्यावर निवडून आल्या होत्या. त्यानंतर भाजपने त्यांना आपल्या गोटात वळवले. त्यांचे पती आमदार रवी राणाहे देखील भाजपच्यासोबत आहेत.

# भाजपा शिरपूर शहराध्यक्षपदी चिंतनभाई पटेल यांची निवड

**धुळे ग्रा. जिल्ह्यातील ७ तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष यांची नियुक्ती**

**शिरपूर । प्रतिनिधी**

भाजपा शिरपूर शहराध्यक्षपदी चिंतनभाई अमरिशभाई पटेल यांची निवड झाली असून धुळे ग्रामीण जिल्हातील ७ तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, ८ मोर्चा जिल्हाध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात आली.



भारतीय जनता पार्टी धुळे ग्रामिण जिल्ह्यातील ७ तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, ८ मोर्चा जिल्हाध्यक्ष जाहिर करण्यात आले आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष आ. चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री ना. गिरीष महाजन, प्रदेश सरचिटणीस विजय चौधरी, विभाग संघटनमंत्री रविंद्र अनासपुरे, जिल्हा प्रभारी श्रीमती स्मिताताई वाघ यांचाशी धुळे ग्रा. भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांनी चर्चा करुन जिल्ह्यातील चार हि तालुक्यातील ७ तालुकाध्यक्ष व शहराध्यक्ष, ८ मोर्चा जिल्हाध्यक्ष (दि. २ ऑक्टों) रोजी जाहिर केले आहेत. त्यात धुळे पुर्व तालुकाध्यक्षपदी देवेंद्र आण्णा पाटील (कुंडाणे वेल्हाणे), धुळे पश्चिम तालुकाध्यक्षपदी रितेश मनोहर परदेशी (कुसुंबा), शिरपूर शहराध्यक्षपदी चिंतनभाई अमरिशभाई पटेल (शिरपूर), शिरपूर तालुकाध्यक्षपदी किशोर विठ्ठल माळी (वाघाडी), शिरपूर सांगवी तालुकाध्यक्षपदी सत्तारसिंग नारखा पावरा, शिंदखेडा तालुकाध्यक्षपदी दिपक वसंतराव बागुल , दोंडाईचा शहराध्यक्षपदी प्रविण हरी महाजन यांची निवड जाहिर करण्यात आली आहे. तसेच भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षापदी धरतीताई देवरे , भाजपा किसान मोर्चा जिल्हाध्यक्षपदी विद्याधर पाटील, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्षपदी राजेंद्र (आर. के) माळी, भाजपा आदिवासी आघाडी जिल्हाध्यक्षपदी जयवंत पाडवी, भाजपा अल्प संख्यक मोर्चा जिल्हाध्यक्षपदी मुबीन शेख, भाजपा वैद्यकिय सेल जिल्हाध्यक्षपदी डॉ. अतुल बडगुजर , भाजपा सोशल मिडीया जिल्हा संयोजक पदी प्रदिप चंद्रशेखर कोतकर, इंजि. अभियंता प्रकोष्ठ जिल्हा संयोजकपदी विजय नंदन (पानखेडा) यांची निवड जाहिर करण्यात आली आहे. तर विविध २ मोर्चा व २४ आघाड्या, प्रकोष्ठचे जिल्हाध्यक्ष लवकरच जाहिर करण्यात येतील असे धुळे ग्रा भाजपा जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

नवनियुक्त तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व मोर्चाचे जिल्हाध्यक्ष यांचे माजी मंत्री आमदार जयकुमार रावल, माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, माजी मंत्री खा. डॉ. सुभाष भामरे, खा. डॉ. हिना गावीत, आ. काशिराम पावरा, जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, धुळे जि. प. अध्यक्षा सौ. अश्विनी पाटील, धुळे मनपा महापौर प्रतिभा चौधरी यांनी अभिनंदन केले.

# शंभर आणि पाचशे रुपयांचे स्टॅम्प बंद करू नये

### धुळ्यात मुद्रांक विक्रेते आक्रमक

**धुळे । प्रतिनिधी**

शंभर आणि पाचशे रुपयांचे स्टॅम्प बंद करू नये, अन्यथा मुंबईतील आझाद मैदानावर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा मुद्रांक विक्रेत्यांनी दिला आहे. जमीन किंवा फ्लॅटच्या खरेदी विक्रीसाठी सध्या वापरात येणारे शंभर आणि पाचशे रुपयांचे स्टॅम्प बंद करण्यात येणार आहे. या स्टॅम्पऐवजी फ्रँकिंग मशिनचा वापर करण्याचा विचार राज्य सरकारने सुरू केला आहे. धुळ्यातील स्टॅम्प वेंडर चांगलेच आक्रमक झाल्याचे बघायला मिळत आहे.

जमिनीचे व्यवहार खरेदी विक्री यासारख्या कायदेशीर गोष्टींसाठी १०० व ५०० रुपयांचे स्टॅम्प पेपर वापरले जातात. मात्र गेल्या काही वर्षात या स्टॅम्प पेपरमुळे अनेक गैरप्रकार घडल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता हे स्टॅम्प पेपर व्यवहारातून बाद होणार असल्याची माहिती आहे. त्याऐवजी तेवढेच किमतीचे स्टॅम्प पेपर राष्ट्रीय बँकेतून फ्रँकिंग करून मिळणार आहेत. त्यामुळे गैर व्यवहारांना आळा बसणार आहे. मात्र याच पार्श्वभूमीवर धुळ्यातील मुद्रांक विक्रेते एकवटले असून शासनाच्या निर्णयाविरोधात आंदोलन करण्यात आले आहे. आता पुढे होणाऱ्या मंत्रिमंडळाने १०० आणि ५०० रुपयाचे स्टॅम्प बंद करण्याचा असा कुठलाही प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर करू नये, अशी मागणी मुद्रांक विक्रेत्यांकडून करण्यात आली आहे. 'इंग्रजांच्या काळापासून मुद्रांक विक्रेते आपला व्यवसाय प्रामाणिकपणे करीत आहेत. कुठल्याही प्रकारची कोणाची आमच्याबद्दल तक्रार नाही. महाराष्ट्रात गाजलेल्या तेलगी घोटाळ्यात सुद्धा एकही मुद्रांक विक्रेत्याचा सहभाग नव्हता हे विशेष आहे. महाराष्ट्रातून सुमारे साडेतीन हजारच्या आसपास मुद्रांक विक्रेता आहे.

# बाभळे जलशुद्धीकरण केंद्राजवळ पाईपलाईन लिकेज



**धुळे । बाभळे जलशुद्धीकरण केंद्र जवळ एअर वाल लीक झाल्यामुळे मोठे गळती लागली होती. यामुळे एक दिवस शहराला उशिराने पाणीपुरवठा होणार असून पाणीपुरवठा चे अभियंता एन जी बागुल यांनी तात्काळ पाईपलाईन रिकामी करून रात्री उशिरापर्यंत काम सुरु होते. यावेळी पंप ऑपरेटर गुरुदत्त सोनवणे, फिल्टर ऑपरेटर अरुण खैरनार, फिटर एकनाथ पाटील ,कोळी पाटील, भैय्या वाघ, पोपटी कोळी, अनिल पवार आधी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.**

# अजिंक्य व्हिलेज परिसरात दुचाकीची जाळपोळ

**नाशिक । प्रतिनिधी**



अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शंभूराजेनगर अजिंक्य व्हिलेज परिसरात पार्क करण्यात आलेली दुचाकी काल सकाळी आठ वाजेच्या सुमारास अज्ञात समाजकंटकांनी पेट्रोल टाकून जाळल्याचा प्रकार समोर आला आहे. सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांना हा प्रकार लक्षात आला. या घटनेमुळे परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान पुन्हा वाहनांची जाळपोळ करण्याचा प्रयत्न सुरू झाल्याने पोलिसांनी या भागातील गुंडगिरी मोडून काढावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येऊ लागली आहे.

# अत्याचार पिडीत युवतीच्या मृत्यूनंतर आरोपीचीही आत्महत्या; तपास अधिकारी निलंबित

**दिंडोरी । प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यातील पिंपळणारे येथील अत्याचार प्रकरणातील अटक झालेला आरोपी पोलिस कोठडीत तपास चालू असतांना पोलिसांच्या हातातून निसटून फरार झाला होता. त्यातील पिडीत युवतीने आत्महत्या केल्याने या प्रकरणाला वेगळेच वळण लागले होते. याची दखल घेत पोलिस अधीक्षकांनी यातील तपासी अधिकारी व सह पोलिसास निलंबित केले. त्यातच आता अत्याचारातील फरारी आरोपीचा मृतदेह विहिरीत आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, दिंडोरी तालुक्यातील पिंपळणारे येथील ग्रामपंचायत सदस्य उमेश बंडू खांदवे (३५) या विवाहित युवकावर गावातीलच एका वीस वर्षीय युवतीने लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याची फिर्याद नोंदविली होती. यात आरोपी उमेश खांदवे याने वेगवेगळ्या ठिकाणी नेऊन वारंवार अत्याचार केल्याची फिर्याद दिली होती. त्यानंतर आरोपी उमेश खांदवे याला दिंडोरी पोलिसांनी ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले होते. न्यायालयाने आरोपीस (दि. ३० सप्टेंबर) पर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. यावेळी पोलिस तपासासाठी दिंडोरी पोलिसांनी आरोपीला स्थळ पंचनाम्यासाठी त्र्यंबकेश्वर येथे घेऊन गेले होते. तेथून परततांना आरोपी लघुशंकेचा बहाणा करुन पोलिसांच्या हाताला झटका देवून फरार झाला होता. तसेच (दि. २८ रोजी) रात्रीच्या सुमारास पोलिसांच्या तावडीतून फरार झाल्यानंतर दुसर्या दिवशी सकाळी त्याच्या शेतातील विहीरीच्याकडेला कपडे व चपला आढळून आल्या होत्या. त्यासोबतच एका चिठ्ठीमध्ये गावातील काही व्यक्तींनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचे नमूद करण्यात आले होते. त्यावेळी विहीरीतआपत्ती व्यवस्थापनाच्या मदतीने शोध घेण्याचा प्रयत्न केला गेला, परंतु, विहीरीमध्ये पाणी जास्त असल्याने त्यास यश आले नाही. त्यानंतर पिडित युवती प्रिया खांदवे हिने त्यांच्या स्वत:च्या विहीरीत दोन दिवसांपूर्वी आत्महत्या केली होती. युवतीच्या आत्महत्येनंतर दोन दिवसांनी विहिरीचे पाणी तीन मोटारीच्या सहाय्याने उपसण्यात आले. उमेशचा भाऊ विहिरीजवळ जाऊन बॅटरीच्या सहाय्याने विहिरीमध्ये बघितले असता त्यात उमेशचा मृतदेह आढळून आला. त्यावेळी त्यांनी तात्काळ दिंडोरी पोलिसांना माहिती दिली.

**सदर अत्याचारातील फरार आरोपी उमेश खांदवे याने मृत्यूपुर्वी आत्महत्येस कारणीभूत ठरलेल्या काही व्यक्तींची नावे लिहून ठेवले आहे. याबाबत सखोल चौकशी करुन सत्यता पडताळण्यात येईल. आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाहीसाठी गुन्हा नोंद करण्यात येईल.**
**– एस.आर. बाबंळे,** अधिकारी
पोलिस उपविभागीय, कळवण



### तपास अधिकारी निलंबित

**या गुन्ह्यात आरोपीला पोलिस कोठडी मिळाल्यानंतर पोलिस तपास करतांना आरोपी पोलिसांच्या तावडीतून फरार झाला होता. फरार आरोपीचा मृतदेह विहीरीमध्ये आढळला. यात हलगर्जीपणाचा ठपका ठेवून पोलिस अधीक्षक शहाजी उमाप यांनी या तपासातील अधिकारी दिंडोरीचे पोलिस उपनिरीक्षक पांडूरंग कावळे व पोलिस नाईक सुदाम धुमाळ या दोघांना निलंबित केले आहे.**

# हाडाखेड सीमा नाक्यावर ६४ लाखांचा गुटखा केला हस्तगत

**शिरपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला ६४ लाखांचा पानमसाला, गुटखा व २५ लाखांचे वाहन असा एकुण ८९ लाखांचा मुद्देमाल हाडाखेडा सीमा तपासणी नाक्यावर सोमवारी जप्त करण्यात आला.

मुंबई-आग्रा महामार्गावरून गुटख्याची वाहतूक होणार असल्याची माहिती सांगवी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जयेश खलाणे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी हाडाखेड सीमा तपासणी नाक्यावर सापळा रचला. पोलिसांनी इंदूरहून शिरपूरकडे जाणाऱ्या कंटेनरला (आरजे-११-जीसी २८०९) थांबवण्याचा प्रयत्न केला. या वेळी चालकाने कंटेनरसह पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून कंटेनर अडवला. त्यानंतर चालक अजीत अमरसिंग याच्याकडे विचारणा केली. या वेळी कंटेनरमध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला ६४ लाख ३५ हजार सुगंधी पानमसाला व गुटखा आढळला. या कारवाईत २५ लाखांचा कंटेनरही जप्त केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक संजय बारकुंड, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुका पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जयेश खलाणे, संदीप पाटील, संजय माळी, यांनी केली.

## महाराष्ट्र नावाचा थंड गोळा

मुंबईतील एखाद्या सहकारी सहनिवासात मराठी असल्याबद्दल एखाद्या तरुणीला जागा नाकारणे आणि राज्य सरकारने दुकानांवर मराठी पाटीची सक्ती केल्यानंतर त्याच्या विरोधात थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत धाव घेणे; या दोन्ही कृतींमागची मनोवृत्ती एकच आहे. ती मनोवृत्ती मराठी भाषा, महाराष्ट्र हे मराठ्यांचे राज्य आणि मराठी अस्मिता यांना आम्ही जुमानत नाही, असे म्हणून त्यांचा उपमर्द करण्याची आहे.

मुंबईत फक्त पैशाची भाषा चालते; असे अनेकांचा समज आहे. काही मराठी नेते आणि नोकरशहा यांनी स्वार्थासाठी परप्रांतीयांची तळी उचलून हा समज पक्का केला आहे. महाराष्ट्राच्या राजधानीत संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर इतक्या वर्षांनी मराठी माणसांना असा अपमान सोसावा लागावा, याची लाजही कुणाला वाटत नाही. महाराष्ट्रासाठी १०७ हुतात्म्यांचे प्राण तर गेलेच; पण लाखो मराठी माणसे मुंबई-बेळगाव-कारवारसहित संयुक्त महाराष्ट्रासाठी अनेक वर्षे झुंजत होती. मुंबई ही मराठी माणसाच्या घामावर उभी राहिली आहे. तिच्यासाठी त्याने आपले रक्त आणि अश्रू वाहवले आहेत. प्राणांची पर्वा केलेली नाही. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर मराठी माणसाचे नाव घेणाऱ्या आणि न घेणाऱ्या अशा सर्वांनीच मराठी माणसाची घोर निराशा केली आहे. त्याच्यावर मुंबईतून हद्दपार व्हावे लागेल, अशी कारस्थाने केली आहेत. सगळ्या आघाड्यांवर मराठी माणसाची सतत पीछेहाट होईल अशी परिस्थिती धनदांडग्यांनी, जुन्या-नव्या दिल्लीश्वरांनी निर्माण केली आणि तिला मराठी माणसाच्या उद्धारकर्त्यांचा बुरखा पांघरलेल्या बहुतेकांनी खतपाणी घातले. आज जो मराठी माणसांचा मुंबईत जागा भाड्याने मिळणे किंवा साध्या दुकानांवरच्या पाट्या लावणे, यावरून जो अपमान होतो आहे, त्याची मूळ कारणे ही घरच्या म्हातारीचे काळ बनलेल्या मराठी नेतृत्वाच्या बोटचेप्या, आत्मघातकी वृत्तीत आहेत. संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर इतक्या वर्षांनीही एकीकडे आम्ही मराठी ही अभिजात भाषा आहे, हे केंद्र सरकारला पटवून देऊ शकलेलो नाही आणि दुसरीकडे, ज्या मराठी माणसाच्या खिशावर ज्यांची दुकाने चालणार, त्यांनाही आम्ही 'तुमच्या दुकानी पाट्या मराठी भाषेत लावा' हे समजावू शकलो नाही. महाराष्ट्राचे राज्यकर्ते आणि समाज यांच्या अपयशाची कक्षा किती विस्तीर्ण आहे, हे यावरून लक्षात यावे. अभ्यासक महाराष्ट्राला दक्षिण आणि उत्तर भारताला जोडणारे सांस्कृतिक दुवाक्षेत्र मानतात. मात्र, महाराष्ट्राने दोन्हींकडून केवळ दुर्गुण घ्यायचे आणि दोघांचेही सद्गुण टाकायचे, अशी दुधारी नीती अवलंबली आहे. चेन्नई आणि तमिळनाडूत कोणत्याही पाटीवरची निम्मी जागा स्थानिक भाषेला म्हणजे तमिळला दिली नसेल तर लगेच दंड ठोठावला जातो. मग तिथल्या व्यापारी संघटना कोणत्या न्यायालयात गेल्या? तसे त्यांनी केले असते तर त्यांना 'दे माय धरणी ठाय..' करून सोडले असते.

बेंगळुरूची कीर्ती अलीकडे आयटीची राजधानी अशी आहे. तेथे महाराष्ट्रासहित देशभरातील हजारो तरुण-तरुणी कामे करतात. बेंगळुरूमध्ये सार्वजनिक दुकाने, उद्योग, मॉल, दवाखाने, बँका, शैक्षणिक संस्था यांच्या पाट्यांवर केवळ ४० टक्के जागा इंग्रजी किंवा कन्नडव्यतिरिक्त इतर भाषांसाठी राखीव असते. ६० टक्के जागा कन्नडसाठी राखीव असते. आणि महाराष्ट्रात मराठी पाट्या लावण्याला विरोध का, तर म्हणे 'आमच्यावर हा वाढीव खर्चाचा बोजा पडेल..' हे काय कारण झाले का? मराठी माणूस एकसंध आणि संघटित नाही. नाही तर, मराठी पाटी नसणाऱ्या सगळ्या दुकाने आणि उद्योगांवर बहिष्कार घालून त्यांना चार दिवसांत सरळ करता आले असते. मराठी माणूस आणि मराठी समाज यांच्याबद्दलचा उद्दाम तिरस्कार हा देशातील अनेक भाषकांमध्ये आहे. त्याची अनेक सांस्कृतिक, ऐतिहासिक, राजकीय कारणेही असू शकतील. मराठी माणसाला आधी 'पानिपता'पासून आणि नंतर टिळक व पुढे आंबेडकर यांच्या अस्तानंतर सगळीकडे माघार घेण्याची, शेपूट घालण्याची सामुदायिक सवय लागली आहे. ती काही जायला तयार नाही. मराठी माणसाचे नाव घेऊन ज्यांनी तलवारी परजल्या; तेही कधी ना कधी आश्रित म्हणूनच राहिले. महाराष्ट्राच्या उत्कर्षाचे मोठे स्वप्न पाहून ते प्रत्यक्षात आणण्याची हिंमत दाखविणारा मराठी समाज आपण उभा करू शकलेलो नाही. त्यामुळे, एका सुविद्य तरुणीला मुलुंडमध्ये जागा भाड्याने न देता घालवून दिले जाते. तिच्या डोळ्यांतून वाहिलेले क्षोभाचे, अपमानाचे अश्रू महाराष्ट्रात स्वाभिमानाचे अंगार पेटवू शकणार नाहीत. याचे कारण, टिळकांनी रानड्यांवरील मृत्युलेखात म्हटल्याप्रमाणे 'महाराष्ट्र हा थंड गोळा' होऊन पडला आहे. कुणावर सूड घेऊन, कुणावर हल्ले चढवून, कुणाचे कपडे फाडून मराठी माणूस, महाराष्ट्र आणि मराठी भाषा मोठी होणार नाही. तिचा स्वाभिमानही जपला जाणार नाही. त्यासाठी मराठी माणसाला विविध क्षेत्रांत पराक्रम गाजवावा लागेल. नुसते तीस-चाळीस तास नाचून चालणार नाही. आमच्या नेत्यांनी इंग्रजी आणि विशेषकरून हिंदीचे आक्रमण रोखण्यासाठी जागे व्हायला हवे. हिंदी मराठीला खाऊन टाकणार असेल, तर ते चालू देता कामा नये. मराठीच्या स्वाभिमानाचे पहिले तेजस्वी स्फुल्लिंग ज्ञानदेवांनी, नंतर छत्रपती शिवरायांनी आणि नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात पराक्रमी नेत्यांच्या चमूने चेतविले होते. आम्ही आता ते सारे विसरून गेलो आहोत. आमच्या भूमीवर आमच्या भाषेतल्या पाट्या वाचण्यासाठी आम्हाला सुप्रीम कोर्टाकडे पाहावे लागते आणि आमच्या मुली मराठी असल्यामुळे नकार आणि धिक्कार सोसून अपमानित होतात. हे स्वप्न संयुक्त महाराष्ट्र जिंकणाऱ्या सेनापतींनी आणि मराठ्यांनी पाहिले होते का?

# रेल्वेची विकासयात्रा



रेल्वेच्या विकासाची गाडी सध्या वेगाने धावत असून स्थानकांचा शाश्वत विकास, उत्तम प्रतीक्षालये आणि स्वच्छतागृहे, मोफत वायफाय, स्थानिक उत्पादनांच्या विक्रीसाठी किऑस्क अशा कल्पना राबवल्या जात आहेत. 'एक स्टेशन एक उत्पादन' या योजनेद्वारे उत्तम प्रवासी माहिती प्रणाली, व्यवसाय बैठकीसाठी खास जागा, लँडस्केपिंग, एक्झिक्युटिव्ह लाऊंज, दिव्यांगांसाठी सोयी अशा गोष्टी उभारल्या जात आहेत.

देशात 'अमृत भारत स्टेशन योजना' सुरू करण्यात आली असून सध्या या योजनेत १२३५ स्थानके घेण्यात आली आहेत. स्थानकांचा शाश्वत विकास करणे, उत्तम प्रतीक्षालये आणि स्वच्छतागृहे, उद्वाहने, मोफत वायफाय, स्थानिक उत्पादनांच्या विक्रीसाठी किऑस्क अशा कल्पना राबवल्या जात आहेत. प्रत्येक स्थानकावरील गरज लक्षात घेऊन 'एक स्टेशन एक उत्पादन' या योजनेद्वारे उत्तम प्रवासी माहिती प्रणाली, व्यवसाय बैठकीसाठी खास जागा, लँडस्केपिंग, एक्झिक्युटिव्ह लाऊंज, दिव्यांगांसाठी सोयी अशा गोष्टी तयार केल्या जात आहेत. या योजनेचे स्वागत केले पाहिजे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत स्थानकांच्या दीर्घकालीन विकासाच्या दृष्टिकोनातून मास्टर प्लॅन तयार केला जात असून या सुविधांमध्ये टप्प्याटप्प्याने सुधारणा केल्या जाणार आहेत. केवळ महाराष्ट्राचे उदाहरण घेतले तर मध्य रेल्वेच्या नागपूर रेल्वे विभागांतर्गत येणाऱ्या गोधनी, काटोल, नरखेड, बैतूल, सेवाग्राम, पुलगाव, धामणगाव, हिंगणघाट, चंद्रपूर, बल्लारशाह वगैरे रेल्वे स्थानकांचा समावेश 'अमृत भारत रेल्वे स्थानक योजने'त करण्यात आला आहे. त्यासाठी ३७२ कोटी रुपयांचा भरीव निधी देण्यात आला आहे. महाराष्ट्रात इतरत्रही ही योजना राबवली जात आहे.

डिसेंबर २०२३ पर्यंत सर्व गाड्यांचे पूर्णपणे इलेक्ट्रिक गाड्यांमध्ये रूपांतर करण्यावर रेल्वेने भर दिला आहे. दुसरे म्हणजे २०३० पर्यंत रेल्वे आणि स्थानकांमध्ये अक्षय स्त्रोतांपासून उत्पादित ऊर्जा पुरवण्यात येणार आहे. हे लक्ष्य साध्य झाल्यास २०३० पर्यंत कार्बन उत्सर्जन ३३ टक्क्यांनी कमी करणे भारताला शक्य होईल, कारण वाहतूक हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे, जिथे उत्सर्जन कमी करण्यास भरपूर संधी आहे. एकीकडे, रेल्वे २०३० पर्यंत मालवाहतुकीतील आपला वाटा ३५ टक्क्यांवरून ४५ टक्क्यांपर्यंत वाढवेल, तर दुसरीकडे अक्षय ऊर्जा क्षमता प्रस्थापित करेल. भारतीय रेल्वे काही नावीन्यपूर्ण उपायांवरही काम करत आहे. बॅटरी प्रकल्पामध्ये २४ तास अक्षय ऊर्जा पुरवठा सुनिश्चित करणे आणि सतत वीज निर्मितीसाठी रेल्वे ट्रॅकच्या समांतर सोलर प्लेट्स बसवणे अशा उपायांवर रेल्वे काम करत आहे. भारतीय रेल्वेने २०१४ पासून डिझेलवर चालणारी इंजिने काढून ब्रॉडगेज रेल्वे ट्रॅकचे विद्युतीकरण करण्याच्या कामाला गती दिली होती. आता डिसेंबर २०२३ पर्यंत संपूर्ण रेल्वे नेटवर्कचे विद्युतीकरण करण्याची रेल्वेची योजना आहे. २०१८-२०१९ मध्ये रेल्वेचा वार्षिक डिझेल वापर ३० हजार ६६० लाख लिटर होता. तो २०२०-२०२१ पर्यंत दहा हजार ९२० लाख लिटरपर्यंत आला. डिझेलवर चालणारे रेक रद्द केल्याने केवळ स्वच्छतेवरच परिणाम झाला नाही, तर आर्थिक फायदाही झाला. २०१९-२०२० या वर्षात, रेल्वेचा वीज वापर २,१०० कोटी युनिट्स होता आणि २०२९-२०३० पर्यंत हा वापर ७,२०० कोटी युनिटपर्यंत जाण्याचा अंदाज आहे.

जुलै २०२२ च्या प्रकाशनानुसार रेल्वे २०३० पर्यंत अक्षय ऊर्जेकडे वळल्यास मागील परिस्थितीच्या तुलनेत ६०० लाख टन कार्बन डायऑक्साइडची भरपाई करेल. २०३० पर्यंत, रेल्वेची एकूण विजेची गरज ८,२०० मेगावॅटपर्यंत वाढेल. मुख्य भाग म्हणजे ९१.५ टक्के वीज अक्षय स्त्रोतांकडून पुरवली जाईल. यासाठी, रेल्वेला ३०,००० मेगावॅट क्षमतेच्या नवीकरणीय ऊर्जा पायाभूत सुविधांची उभारणी करावी लागेल. ऑगस्ट २०२२ पर्यंत भारतीय रेल्वेची अक्षय ऊर्जा निर्मिती क्षमता २४५ मेगावॅट होती. सध्या रेल्वेने स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यासाठी योजना आखल्या असून त्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. रेल्वेमार्गाच्या समांतर, गाड्यांच्या वर, स्थानकांवर आणि प्रशासकीय इमारतींवर सौर पॅनेल बसवण्याची रेल्वेची योजना आहे. दाहोद, गुजरात येथे रेल्वे सोलर-प्लस-स्टोअर हा एक हायब्रिड पायलट प्रकल्प उभारत आहे. त्यातून ट्रॅक्शन नेटवर्कला चोवीस तास वीज पुरवठा होईल. रेल्वे आपल्या स्टेशन्स आणि इमारतींची ऊर्जा कार्यक्षमता सुधारण्यासाठीही काम करत आहे. आतापर्यंत, सातशे स्थानके आयएसओ १४००१ मानकांनुसार बांधली गेली आहेत. ती प्रभावी पर्यावरण व्यवस्थापन प्रणालीवर काम करतात. त्यापैकी ३१ रेल्वे इमारती आणि ३२ स्थानकांना पूर्ततेचे प्रमाणपत्र मिळाले आहे.

रेल्वेची 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' (डीएफसी) ही योजना दोन दशकांनंतर का होईना, जवळपास पूर्णत्वाला आली आहे. त्यामुळे मालवाहतूक क्षेत्रात क्रांतिकारक बदल होणार आहेत. डीएफसी अंतर्गत कोळसा, पोलाद, सिमेंट आणि अन्नधान्य घेऊन १५४ रेल्वेगाड्या पूर्व विभागात धावण्यास सुरुवात झाली आहे. २००६ मध्ये सव्वालाख कोटी रुपये गुंतवणुकीच्या 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला होता. भारतीय रेल्वेने आखलेला हा सर्वात मोठा प्रकल्प होय. पूर्व उत्तर आणि पश्चिम क्षेत्रात डीएफएसअंतर्गत अत्यंत कार्यक्षम अशी रेल्वे वाहतूक सेवा प्रदान केली जात आहे. हा दिल्ली, कोलकाता, मुंबई आणि चेन्नई यांना जोडणारा सुवर्णचतुष्कोन महामार्ग प्रकल्पाला समांतर जाणारा प्रकल्प आहे. ऑगस्ट महिन्यात डीएफएसचा ८० टक्के भाग पूर्ण झाला असून त्याने २,८४३ किलोमीटर अंतर पार केले आहे. भारतीय रेल्वेने 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड'ची स्थापना करून तिच्यामार्फत हा प्रकल्प राबवला आहे. सप्टेंबर महिन्यात पंजाबमधील सहानेवाल ते बिहारमधील सोनगर असा १८७ किलोमीटर अंतराचा टप्पा पूर्ण होईल. उत्तर प्रदेशमधील दादरी ते महाराष्ट्रातील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टपर्यंत तसेच दादरी ते गुजरातमधील साणंद हे ९३८ किलोमीटरचे अंतर गेल्या महिन्यापासून मालवाहतूक मार्गाने जोडले गेले आहे.

या प्रकारची कॉरिडॉर्स अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाची का, हे बघू या. एक तर सध्या प्रवासी मार्गावरूनच मालवाहतूक केली जाते. त्यामुळे अनेकदा रेल्वेमार्गावर गर्दी होते आणि गाड्या उशिरा सुटतात. गंतव्य स्थानी पोहोचण्यासाठीही दिरंगाई होते. या मार्गावरून मालवाहतुकीऐवजी प्रवासी वाहतुकीला जास्त प्राधान्य दिले जाते. केवळ आणि केवळ मालवाहतुकीसाठी उभारण्यात आलेल्या मार्गांमुळे माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वेगाने पोहोचू शकतो. डीएफसी प्रकल्प हे एक तांत्रिक आव्हान होते. कारण त्या अंतर्गत ३०४ रेल्वे पूल तसेच ५६० पुलांखालील रस्ते आणि बायपास लेव्हल क्रॉसिंग्जचा विचार करावा लागणार होता. सध्या रस्ते मार्गाने होत असलेली २६ टक्के वाहतूक आता रेल्वेकडे वळेल, असा प्रशासनाचा अंदाज आहे. गेल्या काही वर्षांमध्ये केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी देशभर दर्जेदार महामार्ग बांधले असून रस्ते मार्गाने मोठ्या प्रमाणावर मालवाहतूक केली जाते. याउलट, १९५० ते २००० या काळात देशातील जवळपास ८५ टक्के वाहतूक रेल्वेमार्फतच होत असे. कारण तेव्हा देशात रस्ते, जोडरस्ते, महामार्ग यांचे प्रमाण अल्प होते. उदारीकरणानंतरच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था वेगाने वाढू लागली; परंतु त्या प्रमाणात रेल्वे मालवाहतूक वाढली नाही. याचे कारण, मालगाड्यांचा वेग संथ आहे. मुंबईहून दिल्लीला माल पोहोचायला तीन, तीन दिवस लागतात. यापुढे मात्र हा वेळ खूप कमी होणार आहे.

सध्या मालगाड्यांचा ताशी वेग २० ते २५ किलोमीटर इतकाच आहे. याउलट डीएफसीवर हा वेग तासाला ६० किलोमीटरपर्यंत जाणार आहे. शिवाय रेल्वे मालवाहतुकीची विश्वासार्हताही वाढणार आहे. त्याचा आणखी एक फायदा म्हणजे, मालगाड्या डीएफसीकडे वळवल्या जाणार असल्यामुळे प्रवासी वाहतुकीचाही वेग वाढेल. सध्या झारखंड, बिहार आणि पश्चिम बंगाल येथून उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा येथील वीज प्रकल्पांसाठी कोळसा वाहून नेला जातो. तो यापुढे झटपट पाठवला जाऊ शकेल. वीज आणि इतर प्रकल्पांना कोळशाचा साठा कमी प्रमाणात ठेवावा लागेल आणि त्यातील त्यांची गुंतवणूकही घटेल. म्हणजे खर्चात बचत होईल. एकूणच, सर्व प्रकारच्या मालवाहतुकीचा आणि त्याच्या साठवणुकीचा खर्च कमी होणार आहे. कार्बन उत्सर्जनातही घट होणार आहे. रेल्वेच्या एकूण वाहतुकीमध्ये मालवाहतुकीचा हिस्सा सध्या २८ टक्के आहे. नजीकच्या भविष्यकाळात तो ४० ते ४५ टक्क्यांवर जाईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. जगामध्ये वाहतूक, साठवणूक वगैरे लॉजिस्टिक्सवरील खर्च एकूण सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या सरासरी आठ टक्के इतका असतो. भारतामध्ये हा खर्च १४ टक्के इतका आहे. डीएफएसमुळे भारतीय कारखानदारांचा वाहतूक खर्च वाचेल आणि जागतिक स्पर्धेत टिकण्याच्या दृष्टिकोनातून भारतीय उत्पादनांचा सरासरी खर्च घटेल. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करण्याची आपली क्षमताही वाढेल.

**- हेमंत देसाई: ज्येष्ठ पत्रकार**

## विद्युतवाहनांची धोरणे व सद्यस्थिती

आता प्रमुख समस्या विजेच्या उपलब्धतेबाबतची आहे. आजही आपल्या देशामध्ये विजेचे उत्पादन खूपच कमी प्रमाणात घेतले जाते. उत्पादन कमी आणि मागणी जास्त अशी परिस्थिती आज देशात आहे. बऱ्याच ठिकाणी आजही मोठ्या प्रमाणात भारनियमन करावे लागते. आपल्या देशातील कोळसा हा चांगल्या दर्जाचा नसल्याने व कोळशाचे प्रमाणही कमी असल्याने चांगला कोळसा हा आपल्याला मोठ्या प्रमाणावर आयात करावा लागतो.


या पुढील काळात सर्वत्र विद्युत वाहने आली तर मोठ्या प्रमाणावर विजेची मागणी वाढेल व त्या प्रमाणात कोळसा आयात करावा लागणार आहे. आज आपल्या इथे ५०% पेक्षा जास्त वीज ही कोळशावर आधारित आहे. मग कोळसा जाळून निर्माण होणारी वीज ही पर्यावरणपूर्वक म्हणता येईल का? हा मुख्य प्रश्न आहे. तसेच या गाड्यांच्या बॅटऱ्यांवर अजूनही प्रश्नचिन्ह उभे केले जाते. या बॅटऱ्यांचे आयुष्य खूप कमी आहे तसेच नादुरुस्त होण्याचे प्रमाणही जास्त आहे. तसेच आजही विद्युत वाहनांचा वेग हा सर्वसाधारण वेगापेक्षा कमी आहे. आजही विद्युत वाहने चार्जिंगशिवाय इतर कशावरही धावण्याची पर्यायी सोय उपलब्ध नाही. त्यामुळे चार्जिंग स्टेशन हाच एक पर्याय या वाहनांसाठी उपलब्ध आहे. त्यामुळे सर्वत्र चार्जिंग स्टेशन उभारणे हा एकच मार्ग धोरणकर्त्यांना अवलंबवावा लागणार आहे.

पुरेशा पावसाअभावी यंदाच्या वर्षी आपल्या देशात विजेच्या मागणीत फार मोठी मागणी वाढली आहे. तसेच जागतिक पातळीवर देशाने कार्बन उत्सर्जनाचे उद्दिष्ट गाठण्याचे मान्य केले आहे. त्यामुळे वीजटंचाईचा प्रश्न विद्युत वाहनांसाठी भविष्यात अडचण तर ठरणार नाही ना? अशी भीती व्यक्त होत आहे. भविष्यात सर्वच प्रकारचा ग्राहक विजेच्या वाहनांकडे वळला तर येत्या काही वर्षांत वीजटंचाई उग्र स्वरूप धारण करेल. पेट्रोल-डिझेलला पर्याय म्हणून जरी विद्युत वाहनांचा विचार पुढे येत राहिला तरी वीजनिर्मिती व त्याची उपलब्धता ही गंभीर समस्या आपण सोडवू शकलो नाही, तर भविष्यातही विद्युत वाहने व पर्यावरण बचतीचा फुगा फुटल्याशिवाय राहणार नाही

**समाप्त:**

**- मुंबई डॉट कॉम : अल्पेश म्हात्रे**

## शब्दकोडे-१९४



**आडवे शब्द**

१. सत्तेचा खेळ ४. 'ज्याने चोच दिली ---- देईल' (म्हण) ७. पर्ण ९. कूर्म १२. उष्ण १४. बाहक भीती निर्माण करणाऱ्या दोन छायाग्रहांपैकी एक १५. दुसऱ्याच्या मनातील भाव ओळखणारा १८. पृथ्वी १९. घाई, निकड २१. पोपटासारखे नाक २२. हावरटपणा २४. मराठीत परमेश्वर, हिंदीत हिरवट, इंग्रजीत घाई २५. फळातील द्रव २७. युद्ध २९. वर्ष (ग्रा.) ३२. फार मोठा फायदा ३५. मर्कट ३७. अखेर, शेवट ३८. कीर्तनकार ४१. घराण्याचे नाव कलंकित करणारा ४४. संरक्षक भिंत ४५. फुरसत ४७. लग्न म्हणजे दोनाचे – हात! ४८. लहान मुलांची शाळा ५१. दणकट ५३. रममाण, निमग्न ५५. दृष्टीभेट ५७. सरस्वतीचे एक नाव ५८. नमस्कार ६०. चणचण, न्यूनता ६३. आरास ६५. पोट ६६. हिंदीत श्रावण महिना ६७. अदबशीरपणा ६८. होडी ६९. एक श्वासरोग ७१. गोदाम ७३. चंद्र ७४. सैन्य ७६. एकरूप ७८. झाडावरून गळलेले, माघार ८०. पुढारी, नेता ८२. पक्षी ८३. लाकडी जिना ८४. किरकोळ सामान ८६. घोड्याचे पायताण ८७. मंत्रीमंडळ ८८. चिवट ८९. टिंगल, चेष्टा ९०. वितरण

**उभे शब्द**

१. संताप २. भरजरी ३. 'इडली आणि ऑर्किड' चरित्र या उद्याजकाचे- 'विठ्ठल ---' ४. नखरा ५. सर्वत्र ६. मनाचे 'के लिहिणारे संत ७. साखरेचा रस ८. आश्चर्य १०. पातळसर ११. व्रत १४. मातीचा कण १६. मऊ १७. मच्छर २०. कोवळा अंकुर २३. अंगावरील बारीक केस २४. आक्षेप २६. मनाला लागलेली टोचणी २८. रमापती ३०. सडपातळ ३१. कुबड ३३. गालफड आत गेलेला ३४. स्तुती ३६. मणका ३९. सरळ, न थांबता ४०. अस्वल ४२. मिंधा ४३. वर्ष, सन ४६. चेहरा, मुख ४८. गोणपाट, पोते ४९. उत्तराधिकारी ५०. संध्याकाळ ५१. डोंगराची काळी मैना ५२. खोदकाम ५३. अनुमती ५४. नुकतेच जन्मला आलेले ५६. कणखर, रांगडा ५९. प्रत्येक दिवशी ६१. माकडांची टोळी ६२. एक तारवाद्य ६४. वरपांगी, दिखाऊ ६५. पार्वतीचे एक नाव ६६. सामन्यातील पराक्रमी ६९. किंमत, प्रत्येक ७०. अफूचे बीज ७२. लोकसभेच्या सदस्य ७३. विपत्तीची कहाणी ७५. सर्वनाश, नेस्तनाबूत ७७. सुसर ७८. उद्याच्या नंतरचा दिवस ७९. पादत्राण ८१. केस रंगवण्याचे साधन ८४. आंचळ ८५. भेग, चिर, सापट

## शब्दकोडे १९३ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.नफा नुकसान ५.कसरत ८.समर ११.वाट १२.रखरखीत १३.अकारण १४.कपट १६. नराधम १८.गाल २१.कणीदार २३.तन २५.सम २६.पाडाव २७.सवड २९अ.भडंग ३०. पाव ३१.गणेश ३३.प्रवाळ ३४. रसवान ३६.मळ ३७.हत्याकांड ३८.मधुबाला ४०.दाणेदार ४२.सण ४३.आडवा ४५.ससा ४७.वाम ४८.गदा ४९.पंडित जवाहरलाल नेहरू ५३.समरस ५५.तर ५६.सजवा ५७.मना ५८.दमा ६०.बेकार ६२.नजर ७१.सावज ८०.खनन ८१.पात ८२.का ८३.मज ८४.रोज ८५.रामरस ८६.खेटर

**उभे उत्तर**

१.नवा २.फाटक ३.कलाटणी ४.नरवर ५.करवत ६.सखी ७.रतन ८.सकाम ९.मर १०.रणगाडा १३.अधम १५.पकडणे १७.रासगरबा १९.लवकर २०.वेस २२.दास २४.नभ २६.पावन २८.वगळणे २९.सवड ३०.पावा ३२.शहर ३३.प्रकांड पंडित ३५.सलाम ३६.मदार ३८.मण ३९.कंड ४१.दावेदार ४२.सरोज ४३. आमने ४४.वासरू ४५.सहज ४६.सारवान ४७.वाल ४८.गम नागमन ५०.तरबेज ५१.वासर ५२.हरकत ५३.सम ५४.सदरा ५९.माजघर ६१.कापा ६३.जनम ानस ६४.रव ६८.कान ७०.नीर ७३.खाजरा ७४.साखर ७५.नंतर ७७.रम ७८.वीज ७९.साज ८१.पाट

## सोभाव (सुत्र १३)
## मानूसना मनमा जसं येस तसं लगेच घडत नै.



डॉ.रा.प्र.पारनेरकर

मानूसना मनमा जसं येस तसं लगेच व्हस असं सहसा घडत नै. मनमा येवानंतर ते प्रत्यक्ष घडावासाठी गनज कालावधी लागी जास.तव्हय तेच ते मनमा सदा डोयासमोर उभं -हास म्हनीसन आपून एखाद काम करानं नक्की व्हस.हायी आपूनले बी याद पडत नै.कोनती बी गोट ठरवतांना जरी आपून मनपासून ठराव तरी तीनी याद स्मरत आपूनले घडी घडी उन्ही नै ते ठरायेल संकल्प म्हना की निश्चय यांनी याद करी नै ते ठरायेल काम व्हवान्या शक्यता नै तव्हय आपून जो मनमा निश्चय करथस तो निश्चय पूरा होईपर्यंत मनमा येवानं हाही एक उपकार करानं -हास असंच शे. तसंच आपुनन्या जीवनमा ब-याच चांगल्या वाईट घटना या घडत -हातीस.तसंच समाज मानपान भी व्हत -हास त्याना परिनाम आपला मनवर व्हत -हास.त्यामुये मन ईकारी नै ते भावना प्रधान व्हत जास.ते मात्र योग्य नै. त्यानामा काल नाहीसा व्हस. आपलं मन सामर्थ्यवान -हात नै. म्हनीसन मनन काही काम काज कसं बंद करता येईन याना ईचार समजदार मानूसले करनं अगदीं गरजन शे.आपून कोनत्याबी गोटना परिनाम ले जेवढं महत्व देतस तेवढं त्या घटनान्या पध्दत रीतले देतस नै. त्यामुये सुसंस्कृत ईचार कराना संस्कार मानूसना मनवर कमी व्हतस. त्यामुये कोनत्याबी गोष्टी सना परिनाम कसा घडत जास नी त्यान मूर्त सोरूपपन ज्ञान नसामुये या परिनामना परिनाम अमुक एक व्हयीन असं म्हनतस. तो तसा घडावो यासाठी कसा कसा प्रयत्न करनं आवश्यक से हाही गोष्ट पुढे येवाना पेक्षा मानूस भवितव्याबाबत उदास नै ते पोक्त आशावादी बनस. भवितव्य हाई बराच टाईमले अज्ञात -हास हाईच खरं शे.पन ते संपूर्ण समद वाटानकारन आपली ईचार करानी जी रीत शै तिना तो सारा दोष शे. दैव,नशिब मानूसले वाटस तेवढं विक्षिप्त -विचित्र वा अकल्पित शे आसत नै.मानूसनी अगदी पध्दतशीर म्हना का रीतसर म्हना योजनात्मक, सृजनशील असा ईचार करानी आपली लायकी वाढीन तो आपला मनवर जर तसा संस्कार करीन तर त्याले आपुला भविष्य नी करता कोनाफाबी कुंडली मांडीसन भविष्य वयखाकरता एवढी गरज पडाव नै.त्याले आपला जववयनाकोन शेत हाई त्याले समजी पन दूरन मातर त्याले सुस्पष्ट आस समजू शकीन. असामानसे विव्दान शेत.यान भविष्य नै . वैचारिक अज्ञानमुये मानूसन मन जास्ती तर जास्त वैफल्य नाराजमानी चिंता कराम्हा बनस.आनी त्याना ईचार फक्त दैववादी च नै ते अज्ञान वादी बनस जास.मन मानूसले आराम लेवू देस नै.हाई नेहमीनी घटना व्हयी जास.पन त्याले कोनता उपाय आपला सहकारी खरा मित्र करता येईन.मनन्या चांगल्या गुनसवर आपला सोभाव परिपोष करीसन जीवन सार्थ करता येईन असा प्रयत्न त्यानी कितला सावा करीत? आपुनन्या मनना विरुद्ध कितलाबी कामस्ना करापेक्षा मनन्या काय काय अडचनी शेतीस त्या समजी लीसन दूर कराले जोयजे.त्याना मूयसोभावले संधी वाव मियाले जोयजे.ती सारखी वाढत कशी जाईन याना प्रयत्न कराले जोयजे.म्हनजे खरा अर्थथून मानूसन जीवन जगन होईन यालेच सोभाव बनावन म्हनथस..

**– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे**

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

## न्यूज कॉलम

### पती-पत्नीकडून एकाची ९० लाखांची फसवणूक

**नाशिक ।** शहराल येथील नाशिकरोड भागात राहणार्या एका तरुणाची तब्बल ९० लाख रुपयांची फसवणूक झाल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात पती-पत्नी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी जेम्स प्रसाद वरसाला (वय ३६, रा. हरी निवास, आनंदनगर, नाशिकरोड, नाशिक) यांनी गंगापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या तक्रारीवरुन पोलिसांनी पद्माकर घुमरे व त्यांच्या पत्नी सुनीता घुमरे उर्फ सुनिता भंडारे (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. या दोघा पती-पत्नी यांनी संगणमत करून जेम्स यांना वाडीवार्हे जवळ अकरा एकर जमीन खरेदी करून देतो, असे सांगून विश्वास संपादन केले होते. त्यानुसार त्यांनी वेळोवेळी बँक खात्यातून पैसे काढून घेऊन जमीन खरेदी न देता पैसे स्वतःच्या फायदा करिता वापरून फसवणूक केली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार २ मे २०१४ ते ३० सप्टेंबर २०१४ या काळात नाशिकच्या गंगापूर पोलीस ठाणे हद्दीतील भोसला कॉलेज जवळ एका ऑफिसमध्ये घडला होता.

# तेरा दिवसांनंतर लासलगाव बाजार समितीत कांदा लिलाव पूर्ववत सुरू

**नाशिक । वार्ताहर**

जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी आपल्या विविध मागण्यांसाठी संप पुकारल्याने गेल्या तेरा दिवसांपासून नाशिक जिल्ह्यातील बाजार समितीमधील कांद्याचे लिलाव बंद होते. नाशिक येथे जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री दादा भुसे व केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ भारती पवार यांनी सोमवार (२ ऑक्टोबर) रोजी कांदा व्यापाऱ्यांसोबत बैठक घेऊन अखेर तोडगा काढल्याने तब्बल तेरा दिवसांनंतर काल मंगळवार पासून कांदा लिलाव पूर्ववत सुरू झाले मात्र कांद्याला मिळणाऱ्या बाजार भावातून उत्पादन खर्चही निघत नसल्याची खंत कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी या वेळी केली.

कांदा व्यापाऱ्यांच्या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन पालकमंत्री दादा भुसे व केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ भारती पवार यांनी दिल्यामुळे जिल्ह्यातील कांदा व्यापाऱ्यांनी त्यांचा संप मागे घेतल्यामुळे जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याचे लिलाव पुन्हा एकदा सुरू झाले मात्र एक महिन्याच्या आत आमच्या अडचणी केंद्र आणि राज्य सरकारने सोडवाव्यात असा थेट इशारा या कांदा व्यापाऱ्यांकडून देण्यात आला आहे.



**शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये कांद्याचे लिलाव पूर्ववत सुरू होण्यासाठी लासलगाव बाजार समितीच्या वतीने सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करण्यात आला. कांद्याचे लिलाव पूर्ववत सुरू झाल्यामुळे शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.लासलगाव बाजार समितीवर शेतकऱ्यांची सकारात्मक भावना आहे.**
**- बाळासाहेब क्षीरसागर, सभापती लासलगाव बाजार समिती**

**गेल्या १३ दिवसांपासून कांद्याचे लिलाव बंद होते मात्र आम्ही मागण्या कायम ठेवत शेतकऱ्यांचा कांदा चाळीत मोठ्या प्रमाणात सडला असून शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी शासनाला या मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी एक महिन्यांची मुदत देत आम्ही कांदा लिलावात सहभागी होत आहे**
**- प्रवीण कदम, कांदा व्यापारी, संचालक लासलगाव बाजार समिती**

लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कांदा लिलाव आवारात मंगळवारी कांद्याचे लिलाव सुरू होताच कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले तर कर्मचाऱ्यांमध्येही उत्साह दिसून आला.लासलगाव बाजार समितीत उन्हाळ कांद्याची ८१४ वाहनातून अंदाजे ११७३० क्विंटल आवक होऊन बाजार भाव कमीत कमी ८०० रु जास्तीत जास्त २५४१ तर सरासरी २०५० रु प्रती क्विंटल दर होते.मात्र या मिळालेल्या दारातून उत्पादन खर्चही निघत नसल्याचे शेतकऱ्यांनी म्हंटले आहे.गेल्या तेरा दिवसांपासून बाजार समित्या बंद होत्या त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.या पुढे सणासुदीचे दिवस असून सण कसे साजरे करावे असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे उभा राहिला आहे

लासलगाव बाजार समितीत व्यापाऱ्यांनी पुन्हा कांदा खरेदीला सुरूवात केल्याने येथे परिसरातील शेतकऱ्यांसह जवळच्या तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपला कांदा बाजार समितीत आणल्यामुळे कांदा लिलाव आवार गर्दीने फुलून गेले होते त्यामुळे काल मंगळवारी येथे उन्हाळ कांद्याची ११७३० क्विंटल कांद्याची आवक झाल्याची माहिती सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपसभापती गणेश डोमाडे, सचिव नरेंद्र वाढवणे यांनी दिली.




## भाजप अल्पसंख्यांक मोर्चा नाशिकतर्फे ‘स्वच्छ भारत अभियान’

**नाशिक । प्रतिनिधी**

भाजपा अल्पसंख्यक मोर्चा व भाजपा महाराष्ट्र प्रदेश यांच्या द्वारे प्राप्त सूचनेनुसार येत्या दि.२ ऑक्टोंबर गांधी जयंती व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवस सेवा सप्ताह निमित्त प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुल्तानी यांच्या नैतृत्वात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत नाशिकमध्ये आठ ठिकाणी कार्यक्रम राबविण्यात आला. धार्मिक स्थळे, शाळा, कॉलेजेस, कब्रस्तान, सार्वजनिक वाचनालय, सार्वजनिक ठिकाणी अभियान राबविण्यात आले.

यावेळी भाजपा प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, संघटनमंत्री रवी भुसारी, भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, गिरीश पालवे, देवदत्त जोशी, गणेश कांबळे, नंदकुमार देसाई, अमित घुगे, विजय बनछोडे आदी उपस्थित होते. चांद शाहवली दर्गा सारडा सर्कल, रसूल बाग कब्रस्तान खडकाली, होली क्रॉस चर्च गंगापूररोड, कविवर्य टिळक वाचनालय, ओम श्री सुखदेव दत्त मंदिर, गुरुनानकजी गुरुद्वारा सिंगाडा तलाव, नॅशनल उर्दू स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, वसंत स्मृती भाजपा कार्यालय येथे कार्यक्रम घेण्यात आलेत.

याप्रसंगी रजनीकांत दळवी, नवाब जहांगीरदार, सनी पंजाबी, अशोक पंजाबी, दिनेश पजवानी, शेरॉन, निर्मला खेमनर, इरफान सय्यद, लखन लबडे, आसिफ बद्रुद्दीन शेख, मोहिनीउद्दीन शेख, आलीभाई शेख, सुनिता डिसूजा, कल्पना डिसूजा, नूरजहाँ शहा, रुबीना शहा, कार्यक्रमाचे आयोजक आरिफ अहमद काझी, शहराध्यक्ष भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा, हिना अहमद शेख, महिला अध्यक्ष भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा, लोकसभा संयोजक नाशिक जिल्हा, फिरोज नजीर शेख (राजू शेख) आदिनी परिश्रम घेऊन अभियान सफल केले.

## गांधी जयंती निमित्त युवक राष्ट्रवादी, मदत फाउंडेशनचे श्रमदान

**नाशिक । प्रतिनिधी**

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती निमित्त नाशिक शहरात ‘स्वच्छता हीच सेवा’ अंतर्गत युवक राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तथा मदत फाउंडेशनचे संस्थापक अंबादास खैरे यांच्या अध्यक्षतेखाली गोदा घाट परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

शहरातील गोदा घाट परिसर व सार्वजनिक परिसर अशा ठिकाणी स्वच्छता अभियान उत्साहात पार पडले.

संत गाडगेबाबा महाराजांपासून ते महात्मा गांधींपर्यंत सर्वांनी स्वच्छतेचे महत्त्व सांगताना सकारात्मक विचारांची निर्मिती होते. असे प्रतिपादन अंबादास खैरे यांनी केले. हरित नाशिक, सुंदर नाशिक अबाधित ठेवण्यासाठी नाशिककरांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. संपूर्ण देशभरात ‘स्वच्छता अभियान’ हे राबवले जात असून बहुतांश नागरिकांनी स्वच्छतेसाठी एक तास श्रमदान केल्याचे दिसून आले आहे. परंतु गोदा घाट परिसर हा नेहमी भाविकांनी गजबजलेला असतो तपोवन पुढील गोदाघाट परिसरात वस्ती नसल्याने तसेच पुरातील पाण्यात वाहून आलेला घनकचरा या परिसरात अडकलेला असल्याने गोदाघाट परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



मोठ्या प्रमाणात लोक आपल्या परिसरात स्वच्छता अभियान राबवताना दिसत आहे. यामुळे युवक व विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची एक मोठी जनचळवळ उभी राहताना दिसत आहे.

यावेळी अमोल नाईक, मुकेश शेवाळे, हर्षल चव्हाण, संदीप गांगुर्डे, संदीप खैरे, पप्पू शिंदे, बंटी थोरात, सागर तांबे, प्रकाश भोर, अशोक पाटील, विनायक जाधव, शुभम पाटील, प्रकाश आव्हाड, स्वप्निल फुले, रोहित जाधव, शितल खैरे, अथर्व कुऱ्हे, रुद्र खैरे, रुजूल खैरे, क्षितिज वेलजाळी, जयदीप सोळंकी, भूषण पाटील, सचिन अहिरे, महेश जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## हिंदू धर्माच्या प्रसार आणि प्रचारात स्वामी विवेकानंदांचे योगदान मोठे

### ज्येष्ठ पत्रकार पद्मश्री रमेश पतंगे यांचे प्रतिपादन

**नाशिक । प्रतिनिधी**

हिंदू धर्माच्या प्रसार आणि प्रचारात स्वामी विवेकानंदांचे योगदान मोठे आहे. त्यानंतर त्यांच्या विचारधारेवर उभा राहिलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे यात मोठे योगदान आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वयंसेवकांमार्फत देशभर जाळे निर्माण करून हिंदू शब्दाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे काम करू लागला. या सगळ्यात जवळपास ५० वर्षांचा कालखंड गेला. दरम्यान, 'कॉल मी डोंकी बट डोंट कॉल मी हिंदू'ची विचारधारा हळूहळू क्षीण होत गेली. त्यानंतर राम जन्मभूमी मुक्ती आंदोलनाने जेव्हा जोर पकडला, तेव्हा मग घोषणा आली 'गर्व से कहो हम हिंदू हैं'. म्हणजे 'डोंकी' पासून 'गर्व' पर्यंत इतका मोठं परिवर्तन हिंदू धर्माविषयी झाले.

आजच्या घडीला हिंदू धर्माविषयी कोणतीही घोषणा अथवा ओळख द्यायची गरज भासत नाही. संपूर्ण जगाला हिंदूचे महत्त्व ज्ञात आहे. त्यामुळे आताचा कालखंड हा खऱ्या अर्थानि हिंदू म्हणून जगण्याचा कालखंड आहे, असे प्रतिपादन सेन्सॉर बोर्डाचे सदस्य, विचारवंत, ज्येष्ठ पत्रकार व पद्मश्री रमेश पतंगे यांनी केले.




रामतीर्थ गोदावरी सेवा समितीच्यावतीने गोदावरी नदीबद्दल नागरिकांच्या मनात पूज्य श्रद्धाभाव प्रकट व्हावा, यासाठी आरती व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यात जवळपास १५० कार्यकर्त्यांनी समाजामध्ये जाऊन नागरिक व विद्यार्थ्यांना गोदावरीची महती विशद केली. या सगळ्यांचे कौतुक करावे व नाशिककर नागरिकांना रामतीर्थ गोदावरी सेवा समितीच्या उपक्रमाची माहिती व्हावी, या उद्देशाने रविवारी शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी न्यास सभागृहात गोदाप्रेमींचे स्नेह मिलन व सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.

रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक तथा प्रदेश भाजपचे माजी संघटन मंत्री प्रा. रवी भुसारी हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. यावेळी रा. स्व. संघाचे नाशिक विभाग संघचालक कैलास साळुंके, आ. सीमा हिरे, आ.ॲड. राहुल ढिकले, रामतीर्थ गोदावरी सेवा समितीचे अध्यक्ष जयंत गायधनी, इस्कॉन नाशिकचे अध्यक्ष कृष्णधन प्रभू, आर्ट ऑफ लिव्हिंगचे चिराग पाटील आणि गोदाप्रेमी, शिक्षक व गोदा सेवक उपस्थित होते.

यावेळी प्रा. रवी भुसारी म्हणाले की, सच्च्या गोदा भक्ताने जे त्याच्या जवळ आहे ते नेहमी समाजाला दिले पाहिजे. याचे उत्तम उदाहरण म्हणजेच पंतप्रधान नरेंद्र मोदी. ते गुजरातचे मुख्यमंत्री असताना ते विविध कार्यक्रमांमध्ये मिळालेल्या भेटवस्तू कोणत्याही कार्यकर्त्याला किंवा नातेवाईकाला न देता त्यांचा लिलाव करीत असे. यातून मिळालेली धन राशी ते अनाथ बालिकांच्या शिक्षणावर खर्च करीत. २००१ ते २००९ च्या काळात त्यांनी लिलावामार्फत तब्बल १८ कोटी रुपये जमवून पैसे सत्कर्मी लावले. याप्रमाणेच प्रत्येक गोदा भक्ताने आपल्या परीने गोदावरीची सेवा करायला हवी, असे यावेळी रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक तथा प्रदेश भाजपचे माजी संघटनमंत्री प्रा. रवी भुसारी यांनी आवाहन केले.

यावेळी आ. राहुल ढिकले म्हणाले की, गोदावरीची जेवढी महती सांगावी तेवढी कमी आहे. बालपणापासून गोदावरीच्या कुशीत वाढल्याने गोदामाई मला नवीन नाही. इतरांसाठी ती गोदावरी असेल. परंतु, मूळ नाशिककरांसाठी ती गंगा आहे. १७ ते १८ वर्ष कुस्तीचे प्रशिक्षण घेत असताना प्रशिक्षण झाल्यावर दररोज गोदातीरी स्नानासाठी जात असे व मनोमन तिचे आभार मानत असे. तिचाच आशीर्वाद म्हणून मी आज आमदार झाल्याचे मला वाटते. त्यामुळे गोदावरी संबंधित कोणत्याही कार्यात माझा पुढाकार राहील, तसेच तीच्या सेवेत कुठलीही शासकीय मदत कमी पडणार नाही यासाठी मी कटिबद्ध राहील, असे आश्वासन यावेळी आ. राहुल ढिकले यांनी दिले.

## उत्तमनगर येथील स्फोट गॅस गळतीमुळेच- उपायुक्त राऊत

**सिडको । प्रतिनिधी**

उत्तमनगर परिसरात एका घरात स्फोट होऊन घरातील तीन जण जखमी झाल्याची घटना घडली होती. याबाबत गॅस गळतीमुळेच सदरहू स्फोट झाल्याची माहिती पोलिस उपायुक्त मोनिका राऊत यांनी दिली.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि, बुधवार (दि.२७ सप्टेंबर) सकाळी सहा वाजेच्या सुमारास उत्तमनगर येथील सर्वेश्वर महादेव चौकातील एका घरात अचानक स्फोट झाला होता. यामध्ये घरातील तुषार पंडित जगताप (३४), त्यांची आई शोभा पंडित जगताप (६५), सासरे बाळकृष्ण तुळशीराम सुतार (६८) हे तिघे भाजले होते. तर घरात खिडकीत ठेवलेले कॉस्मेटिक वस्तू, बॉडी स्प्रे, मोबाईल फोन खिडक्या फुटून बाहेर फेकले गेले. स्फोट एवढा भीषण होता की, घरासमोर पंधरा ते वीस फुटाच्या अंतरावर असलेल्या चारचाकी वाहनांच्या काचाही फुटल्या होत्या. यावेळी मोबाईलचा स्फोट झाल्याने सदरहू अपघात घडल्याचे प्रथम दर्शनी सांगण्यात आले होते. मात्र तपासाअंती शोभा पंडित जगताप यांनी अंघोळीचे पाणी तापवायला गॅसचे बटन सुरु केले होते. मात्र गॅस न पेटल्यामुळे त्यांनी माचीस शोधायला सुरवात केली. यावेळी गैसचे बटन सुरूच होते. शोभा यांना माचीस सापडल्यानंतर त्यांनी काडी पेटवली असता घरात जमलेल्या गॅसने पेट घेतल्याने मोठा स्फोट झाला. अशी माहिती पोलिस उपायुक्त मोनिका राऊत यांनी दिली.

## अंबड औद्योगिक वसाहतीतील मूलभूत समस्या तातडीने सोडवा

### आयमाचे महापालिका आयुक्तांना साकडे

**नाशिक । प्रतिनिधी**

अंबड व सातपूर औद्योगिक वसाहती या नाशिक महापालिकेला सर्वाधिक महसूल देत असल्या तरी त्या तुलनेने या परिसरात मूलभूत सुविधा मात्र पुरेशा उपलब्ध होत नाहीत. अशी खंत व्यक्त करून आयुक्तांनी या प्रश्नात जातीने लक्ष घालून उद्योजकांना जास्तीत जास्त सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, या मागणीचे निवेदन आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांना सादर केले.



आयमाच्या शिष्टमंडळाने मनपा आयुक्त डॉ.अशोक करंजकर यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन अंबड आणि सातपूर परिसरातील उद्योजकांना भेडसावत असलेल्या विविध समस्यांबाबत चर्चा केली. यावेळी आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ, बीओटी चेअरमन ज्ञानेश्वर गोपाळे, उपाध्यक्ष राजेंद्र पानसरे, सुदर्शन डोंगरे, सचिव गोविन्द झा, मूलभूत सेवा समितीचे चेअरमन कुंदन डरंगे आदी उपस्थित होते.

अंबड औद्योगिक वसाहतीतील रस्त्यांची स्थिती अतिशय दयनीय आहे. ठिकठिकाणी पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघातांना निमंत्रण मिळते. काहीजण प्राणास मुकतात तर अनेक जण जायबंदी होतात. त्यामुळे खड्डे बुजविण्याचे काम युद्ध पातळीवर हाती घ्यावे. परिसरातील वाहतूक मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे रस्त्यांचे रुंदीकरण होणे गरजेचे असल्याचे आयमाचे अध्यक्ष निखिल पांचाळ यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणले. तसेच रस्त्यावरच सांडपाणी साचत असल्याने अस्वच्छता तसेच दुर्गंधीला निमंत्रण मिळते. सांडपाण्याचा निचराही होणे गरजेचे आहे. दसरा व दिवाळीच्या काळात चोऱ्यांचे तसेच लुटमारीचे प्रमाण वाढत असल्याने औद्योगिक वसाहतीतील बंद स्थितीत असलेल्या पथदीपांची दुरुस्ती करावी तसेच आवश्यक तेथील विद्युत खांब बदलावेत. वर्दळीच्या ठिकाणी हायमास्क बसवावेत, औद्योगिक वसाहतीतील नाले पुनरुज्जीवित करावेत, साथीच्या आजारावर नियंत्रणासाठी औषध फवारणी व धूर फवारणी करण्यात यावी, औद्योगिक घरपट्टी पूर्वीप्रमाणेच आकारावी, अतिक्रमण हटाव मोहीम युद्ध पातळीवर राबवावी, घंटागाड्यांची संख्या वाढवावी तसेच त्यावर नकाशा फलक व प्रबोधन गीत लावावे आदी मागण्यांचाही निवेदनात समावेश आहे. या मागण्यासंदर्भात आपण जातीने लक्ष घालू आणि त्या संदर्भात आयमा कार्यालयात स्वतंत्र बैठक घेऊन उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन आयुक्त डॉ. करंजकर यांनी शिष्टमंडळास दिले.

**ॲड. योगीराज दिलीप सोनवणे, धुळे**
**निशाणी नं.- ६**

**जाहिर नोटीस**

**साक्री येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज क्र.२६४/२०२३**

१. मालिसर रघा उर्फ रय्या भोसले उ.व.-५५, धंदा-शेती
२. आलिस रय्या उर्फ रघा भोसले उ.व.-६७, धंदा-शेती
नं. १ व २ रा. मु. जामदे पो. टिटाणे,
ता. साक्री, जि. धुळे. **..अर्जदार**

**।। विरुध्द ।।**

**कोणीही नाही** **... सामनेवाला**
**आणि**

कै. रघा गटल्या भोसले (मयत) मृत्यु दि. २०/०८/२०००
मृत्यु ठिकाण : जामदे, ता. साक्री, जि. धुळे **...मयत**

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. रघा गटल्या भोसले (मयत) यांचे अर्जदार यांना शासकीय तसेच निमशासकीय तसेच इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने तसेच अर्जदार हे कै. रमा गटल्या भोसले (मयत) यांचे कायदेशीर वारस असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. १६/०८/२०२३ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ६/११/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- २९/०९/२०२३

**कामगिरी कारकुन**
**मे.दिवाणी न्यायालय सो.**
**कोर्ट नं.**

(शिक्का)

**सहा.अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो.**
**कोर्ट नं.**

**न्यूज कॉलम**

### अनोळखीचा दोंडाईचात मृत्यू

**दोंडाईचा ।** शहरात चैनी रोडवर आढळलेल्या अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला. २८ सप्टेंबरला सायंकाळी चैनी रोडवर एक अनोळखी व्यक्ती बेशुद्धावस्थेत आढळली. तिला अभय गवते, शरद लेंडे यांनी नगर परिषदेच्या वाहनातून दोंडाईचा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# सातरणे येथे १ कोटीच्या विकास कामांचा प्रा.अरविंद जाधव यांच्या हस्ते शुभारंभ

**धुळे । प्रतिनिधी**



तालुक्यातील सातरणे येथे पाणीपुरवठा योजना, रस्ता काँक्रीटीकरणासह सुमारे एक कोटी रुपये खर्चाच्या विकास कामाचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे अध्यक्ष इंजिनिअर अश्विनी पाटील यांचे प्रतिनिधी माजी कृषी सभापती प्राध्यापक अरविंद जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धुळे तालुक्यातील सातरने गावाची निकड लक्षात घेता धुळे जिल्हा परिषद अध्यक्ष इंजि.अश्विनी पाटील यांच्या निधीतून भरीव विकास कामे मंजूर करण्यात आली आहे. या कामांचा शुभारंभ माजी कृषी सभापती प्राध्यापक श्री अरविंद जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये अध्यक्ष अश्विनीताई पाटील यांच्या निधीतून ५४ लेखाशीर्ष अंतर्गत गावातील प्रमुख रस्त्यावर काँक्रिटीकरण करणे, जन सुविधा कार्यक्रमातून प्रमुख मार्गावर पथदिवे लावणे,अपारंपारिक ऊर्जा या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाच्या माध्यमातून गावामध्ये सौर दिवे लावणे, गावांतर्गत पेवर ब्लॉक बसवणे, जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत पिण्याच्या पाण्याची टाकी व अनुषंगिक कामे, देखभाल दुरुस्ती कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून ३० लाख रुपये असा जवळपास एक कोटी खर्चाचे विकासकामांचा समावेश आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष अश्विनीताई पाटील यांचे प्रतिनिधी माजी कृषी सभापती प्राध्यापक अरविंद जाधव यांच्या हस्ते या कार्यक्रमांचा शुभारंभ करण्यात आला. त्यासाठी खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या सर्व कामाच्या उद्घाटन प्रसंगी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यात संजय राजधर पाटील, सुनील ठाकरे, चेतन ठाकरे ,भाऊसाहेब पाटील, भरत पाटील, बंटी पाटील, अशोक पाटील,धनराज पाटील ,पिंटू पाटील, रामकृष्ण पाटील ,नंदू पाटील, किशोर पाटील, सुभाष पाटील ,योगेश पाटील, दुर्गादास पाटील, मनोहर पाटील, धनराज पाटील, शुभम पाटील, भाऊराव पाटील, आधार पाटील,जयेश पाटील आदी उपस्थित होते. विविध विकास कामाचा शुभारंभ झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

# आयुष्मान भव मोहीमेचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार देण्यात येणार

**मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांची माहिती**

**धुळे । प्रतिनिधी**



आयुष्मान भव मोहिमेतंर्गत दिलेल्या सहा निर्देशांकाचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना राष्ट्रीय पातळीवर आयुष्मान ग्रामपंचायत घोषित करुन पुरस्कार देण्यात येणार असल्याने या अभियानात जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांनी बोरकुंड येथे केले.

धुळे तालुक्यातील बोरकुंड येथे आयुष्मान भव मोहिमेतंर्गत सावता मंगल कार्यालय येथे सोमवारी आयुष्मान ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी श्री.गुप्ता बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रा.अरविंद जाधव, जिल्हा परिषद सदस्य शालिनी भदाणे, अनिता पाटील, पंचायत समिती उपसभापती देवेंद्र माळी, सरपंच सुनीता भदाणे, उपसरपंच बेबाबाई माळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांच्यासह गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.गुप्ता म्हणाले की, केंद्र शासनामार्फत सर्व जिल्ह्यांमध्ये १३ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत आयुष्मान भव मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत मार्च २०२४ पर्यंत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये सर्व ५ वर्षावरील पात्र लाभार्थी यांना आयुष्मान कार्डचे वाटप करणे, ५ वर्षावरील सर्व नागरिकांना आभा कार्डचे वाटप, ३० वर्षावरील नागरिकांची मधुमेह व उच्चरक्तदाब तपासणी, संशयीत कर्करोग निदान व उपचार, ३० वर्षांपर्यत नागरिकांची सिकलसेल तपासणी, संशयीत कुष्ठरोग तपासणी व यशस्वी उपचार करुन ग्रामपंचायतस्तरावर वरील सहा निर्दे शकांचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना केंद्र शासनामार्फत राष्ट्रीय पातळीवर पुरस्कार देवून गौरविण्यात येणार आहे. यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रामपंचातीनी या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन श्री.गुप्ता यांनी यावेळी केले. तसेच आयुष्मान भव मोहिमेतंर्गत १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर, २०२३ या कालावधीत सर्व आरोग्यावर्धिनी प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, आयुष आरोग्यवर्धिनी केंद्र या ठिकाणी आरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच या मोहिमेंतर्गत महिन्याच्या पहिल्या शनिवारी असंसर्गजन्य आजार मधुमेह व उच्च रक्तदाबचे निदान व उपचार, दुसऱ्या शनिवारी टी.बी. व इतर संसर्गजन्य आजार तपासणी व उपचार, तिसरा शनिवार माता आरोग्य व बाल आरोग्य तपासणी, पोषण आहार मार्गदर्शन व चौथा शनिवार सिकेल सेल तपासणी व सिकेल सेल कार्ड वाटप तसेच कान, नाक व घसा तपासणी तसेच नेत्र रोग तपासणी करण्यात येणार आहे. तसेच या आयुष्यमान मोहिमेची माहिती देण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने ग्रामसभेचे आयोजन करावे. या ग्रामसभेत नागरिकांना आयुष्यमान कार्ड, आभाकार्डची माहिती द्यावी असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी माजी कृषी सभापती श्री.जाधव म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आरोग्य हीच खरी संपत्ती आहे हे जाणले म्हणूनच तळागाळातल्या शेवटच्या माणसाला आरोग्याचे कवच मिळावे या हेतूने आयुष्यमान भव अभियान संपूर्ण देशात राबवले जात आहे. याचाच एक भाग म्हणून धुळे जिल्ह्यात राष्ट्रपिता महात्मा गांधी व माजी प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीच्या निमित्ताने आयुष्यमान ग्रामसभेचे आयोजन करण्यात येत आहे. आयुष्मान भव मोहिमेतंर्गत दिलेल्या सहा निर्देशांकाचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना राष्ट्रीय पातळीवर आयुष्मान ग्रामपंचायत घोषित करुन पुरस्कार देण्यात येणार आहे. यासाठी केंद्र शासनाने काही इंडिकेटर निश्चित केले आहे. त्यांचे पालन जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीने केले तर ग्रामपंचायत ही आयुष्यमान ग्रामपंचायत घोषित होईल. तसेच बोरकुंड ग्रामपंचायतीला हा पुरस्कार मिळण्यासाठी सर्व लोकप्रतिनिधी व नागरिकांनी सहकार्य केल्यास नक्कीच हा पुरस्कार प्राप्त होईल अशी आशा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

प्रास्ताविकात बोलतांना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बोडके म्हणाले की, आयुष्यमान कार्ड मार्फत नागरिकांना १२९६ आजारावर ५ लाखापर्यंत मोफत उपचार केले जातात. बोरकुंड गावात ६६० आयुष्यमान कार्डचे लाभार्थी असून त्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा. तसेच हे कार्ड मिळण्यासाठी सर्व ग्रामपंचायतीमध्ये आठवड्यातून दोन दिवस कॅम्पचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. तसेच आशा सेविकांमार्फत लाभार्थीची माहिती घेण्यासाठी घरोघरी सर्व्हेक्षण करीत आहे. तसेच ५ वर्षावरील सर्व नागरिकांनी आभाकार्ड काढण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ.तरन्नुम पटेल यांनी यावेळी अवयव दानाची शपथ उपस्थितांना यावेळी दिली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते टीबी चॅम्पियन, निश्चय मित्र यांचा सन्मान करण्यात आला व आभा कार्डचे वितरण करण्यात आले. या ग्रामसभेच्या निमित्ताने आयोजित शिबिरास मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांनी भेट दिली व ग्रामस्थांची विचारपूस देखील केली. यावेळी रावसाहेब भदाणे, भीमराव देवरे, रवींद्र भदाणे, संजय माळी, मोहन भदाणे, मनोज अहिरे, दिनेश पाटील, संजय भदाणे, प्रशांत आढावे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# भोरखेडा पटेल विद्यालयात सुंदर हस्ताक्षर स्पर्धा संपन्न

**तऱ्हाडी । प्रतिनिधी**




आर. सी. पटेल माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय भोरखेडा येथे २ आक्टोबर राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्त सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भोरखेडा कॉलेजचे प्राचार्य आर.एफ.शिरसाठ होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून पर्यवेक्षक सी.जी.पाटील होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पुजन होऊन सुंदर हस्ताक्षर स्पर्धेला सुरुवात झाली.

तीन गटात झालेल्या या हस्ताक्षर स्पर्धेत १७७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता.त्यात ५ वी ते ७ वी च्या प्रथम गटात प्रथम क्रमांक हर्षदा महेंद्र चौधरी, द्वितीय क्रमांक जाधव लोकेश जितेंद्र तर तृतीय क्रमांक पाटील सत्यम समाधान तर उत्तेजनार्थ राठोड रोशनी यांनी मिळवले. ८ वी ते १० वीच्या द्वितीय गटात प्रथम प्रियंका मुरलीधर देवरे, द्वितीय क्रमांक संध्या रवींद्र पवार व प्रतीक दिनेश राजपूत यांना विभागून देण्यात आले. तृतीय क्रमांक विभागून पूर्वा दत्तू निकम व रणवीर चरणसिंग बंजारा,उत्तेजनार्थ क्रमांक विवेक दिनेश बंजारा यांनी मिळवले. तर ११वी,१२वी च्या ज्युनिअर कॉलेज गटात प्रथम क्रमांक बंजारा दिपाली दरबार , द्वितीय क्रमांक विभागून बंजारा कंचन सजन व श्रीराव प्रेरणा नाटुलाल, तृतीय क्रमांक वंजारी प्रणव संजय तर उत्तेजनार्थ बक्षीस प्रियंका राधेश्याम बंजारा व जाधव नव्या शिवदास यांनी मिळवले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्वश्री.एन.डी. चव्हाण, एस.आर.देसले. पी.टी.चौधरी, एन.वाय.बोरसे, एस.एम.पाटील, व्ही.एस.इशी, एम.जी.वाडिले, डी.आर. राजपूत, व्ही.बी.शर्मा, पी.एस. परदेशी, आफ्रिद पटेल,जे.डी. पाटील, तुषार पाटील, चंदन पावरा, सुनील पावरा, सुभाष निकुंभे, एम.टी.पटेल, दिपाली निकम, रुपाली तिरमले, ऐश्वर्या मोराणकर यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आयोजन व्ही. एस.इशी व एम.जी.वाडिले यांनी केले.स्पर्धेचे परीक्षण एस.एम. पाटील व आर.जी.पाटील यांनी केले.

# अनुदानित आश्रमशाळा सामोडे येथे महात्मा गांधी जयंती साजरी

**सामोडे । प्रतिनिधी**



अनुदानित आश्रमशाळा सामोडे येथे २ आक्टोंबर महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली. प्रथमतः शाळा व शाळाबाह्य परिसर विद्यार्थी व शिक्षक यांनी स्वच्छ केला.नंतर महात्मा गांधी जयंती साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक पी.व्ही.जगताप तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य झेड.एम.गवळी, उमेश माळी, मनेष माळी वाघसर होते.मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.महात्मा गांधी बाबत उमेश माळी यांनी माहिती दिली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विजय ढोले यांनी तर आभारप्रदर्शन पी.डी.गायकवाड यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील चतुर्थ कर्मचारी विलास पगारे यांच्या सह शिक्षक, शिक्षिका व चतुर्थ कर्मचारी प्रयत्नशील होते.

# जिल्हा स्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये किशोर सूर्यवंशी प्रथम

**जैताणे । प्रतिनिधी**



शिरपूर येथे भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयाची मान्यता असलेल्या स्टेअर्स फाऊंडेशनतर्फे धुळे जिल्हास्तरीय मुला-मुलींचे फ्रीस्टाईल कुस्ती स्पर्धेला शिरपुर येथील क्रीडा संकुलात नुकतेच प्रारंभ झाले शिरपुर विभागाचे डी. वाय.एस.पी. सचिन हिरे साहेब यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा स्तरीय कुस्ती स्पर्धेमध्ये जैताणे चे सुपुत्र पैलवान किशोर सूर्यवंशी(मुन्ना माळी) याने ६५ किलो वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला आणि सोल्हापुर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत मजल गाठली त्या बद्दल त्याचे जैताणे निजामपूर परिसरातील बिरसा मुंडा तालीम जय भद्रा व्यायाम शाळा संजय नगर व जय बजरंग आखाडा रामी,महात्मा फुले व्यायाम शाळा माळीवाडा जैताणे,समस्त पैलवान मित्रांकडून मिरवणूक काढण्यात आली व सत्कार करण्यात आला.

### विषबाधा झाल्याने शेतकऱ्याचा मृत्यू

**धुळे ।** फवारणी करताना विषबाधा झाल्याने तरुण शेतकऱ्याचा मृत्यू झाला. रविवारी (ता. १) दुपारी ही घटना घडली. अभिजित रमेश बिऱ्हाडे (वय २५, रा. इंदिरानगर, शिरूड, ता. धुळे) असे मृताचे नाव आहे. तो रविवारी स्वतःच्या शेतात कपाशीवर औषध फवारणीसाठी गेला. त्यादरम्यान विषारी औषध नाकातोंडात गेल्याने त्याला मळमळ होऊ लागली. त्याला जिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# स्व.रसिकलाल पटेल पतसंस्थेची वार्षिक सभा संपन्न

**७ लाखाच्या विक्रमी लाभातून सभासदांना ७ टक्के वाटपासह विविध ठराव मंजूर**

**होळनांथे । प्रतिनिधी**



होळनांथे येथील स्व. रसिकलाल पटेल ग्रामीण सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण वातावरणात संस्थेचे अध्यक्ष सागर हुकुमचंद जैन यांच्या अध्यक्षतेखाली तर संस्थेचे ज्येष्ठ संचालक तथा संस्थापक अध्यक्ष डॉ. पृथ्वीराज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली.

श्री ट्रेडर्सच्या जागेवर झालेल्या २१व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सुरुवातीला संस्थेचे आश्रयदाते स्वर्गीय पप्पाजी उर्फ स्व. रसिकलाल पटेल यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष सागर जैन यांनी आपल्या प्रस्ताविकेतून संस्थेची होत असलेली प्रगती, गेल्या वार्षिक वर्षात झालेला संस्थेला नफा, संस्थेचे भांडवल, राबवण्यात येत असलेले उपक्रम यासंदर्भात सविस्तर माहिती दिली. तर संस्थेचे संचालक तथा संस्थापक अध्यक्ष डॉ. पृथ्वीराज पाटील यांनी पतसंस्थेद्वारे राबवण्यात येत असलेले विविध उपक्रम, पतसंस्थेचे कामकाज व भविष्यातील उपक्रम यासंदर्भात सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास संस्थेचे संचालक तुळशिराम मराठे, प्रशांतसिंग राजपूत, विजयसिंग सिसोदिया, शांताराम चौधरी, दयाराम मेहते आदींसह जेष्ठ नागरिक सभासद लक्ष्मन पाटील, सुरेंद्रसिंग सिसोदिया, दयाराम राठोड व मंगल धनगर व जाकीर खाटीक आदिल सहसंचालकांची मोठी उपस्थिती होती.

# साक्री न्यायालयात महात्मा गांधी जयंती निमित्त ‘स्वच्छता हि सेवा’ उपक्रम संपन्न

**साक्री । प्रतिनिधी**

**प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्री. आर. के. मलाबादे यांच्या आदेशान्वये व न्यायाधीश संदीप स्वामी, सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, धुळे यांचे मार्गदर्शनाखाली महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधुन साक्री न्यायालयात राष्ट्रीय मोहिम ‘स्वच्छता हि सेवा’ २०२३ अंतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सदर अभियानात येथील सर्व न्यायिक अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी वर्ग तसेच साक्री वकील संघाचे पदाधिकारी व वकील वर्ग यांनी सहभाग नोंदवित न्यायालयीन परिसराची स्वच्छता केली.**



साक्री न्यायालयात न्यायिक अधिकारी, वकील संघाचे पदाधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच न्यु इंग्लिश स्कुल, साक्री येथील ११ वी व १२ वीचे विद्यार्थी व शिक्षक वृंद यांनी सहभाग नोंदवुन न्यायालय परिसराची स्वच्छता केली व महात्मा गांधी यांचे जयंती निमित्त प्रतिमा पुजन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन न्यायाधीश श्री. के. टी. अढायके, प्रमुख पाहुणे म्हणुन न्यायाधीश श्री. आर. बी. डोळे व श्री. एन. एल. पाटील तसेच साक्री तालुका वकिल संघाचे अध्यक्ष ॲड. वाय. पी. कासार व वकिल संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी जेष्ठ विधीज्ञ ॲड. एम. झेड. देवरे यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनप्रवासाविषयी थोडक्यात माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात न्यायाधीश श्री. के. टी. अढायके यांनी महात्मा गांधीचे स्वातंत्र लढयातील योगदान याविषयी माहिती दिली तसेच विदार्थ्यांना शालेय जीवनात महात्मा गांधींचे विचारांचे महत्व पटवुन दिले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. वाय. सी. शिरसाठ व.सहायक, साक्री न्यायालय यांनी केले. साक्री न्यायालयात राष्ट्रीय मोहिम ‘स्वच्छता हि सेवा’ २०२३ अंतर्गत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सदर अभियानात येथील सर्व न्यायिक अधिकारी, न्यायालयीन कर्मचारी वर्ग तसेच साक्री वकील संघाचे पदाधिकारी व वकील वर्ग यांनी सहभाग नोंदवित न्यायालयीन परिसराची स्वच्छता केली.

### महिलेला मारहाण; एकावर गुन्हा

साक्री । महिलेला लाथांनी मारहाण केल्याप्रकरणी एकावर गुन्हा दाखल झाला. याबाबत अंजनाबाई सुरेश वाघ (रा. भडगाव ता. साक्री) यांच्या फिर्यादीनुसार त्यांचा मुलगा सोमनाथ वाघ हा काहीतरी बोलला, असा गैरसमज करून गावातील नीलेश भास्कर वाघ याने त्याच्याशी वाद घातला. त्याला शिवीगाळ करत असताना अंजनाबाई भांडण सोडविण्यासाठी गेल्या असता त्यांना नीलेश याने कानशिलात व पोटात लाथ मारून खाली पाडले. तसेच लाथा मारून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली.

**घर विकणे आहे**

चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयींनीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे

: संपर्क :

Mo. 81779 29477



# स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत जिल्ह्यात 'स्वच्छता रन'

## ग्रामस्थांनी स्वच्छता शपथ घेत केले श्रमदान !



















धुळे

। स्वच्छतेसाठी स्वच्छता ही सेवा मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील चारही तालुक्यांमध्ये रविवारी सकाळी स्वच्छता रन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. स्वच्छतेचा संदेश देत अधिकारी पदाधिकारी,महाविद्यालयीन तरुण तरुणी,ग्रामस्थ धावले. यावेळी सहभागींना स्वच्छता शपथ देण्यात आली. तसेच स्वच्छतेसाठी श्रमदान ही करण्यात आले. स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा सौ. अश्विनीताई पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शुभम गुप्ता, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष श्री देवेंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री चंद्रकांत पवार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री बाळासाहेब बोटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता ही सेवा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्वच्छता ही सेवा २०२३ ची थीम कचरामुक्त भारत आहे. या मोहिमेअंतर्गत धुळे जिल्ह्यातील चारही तालुक्यात रविवारी सकाळी स्वच्छता रन हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमास ठिकठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाला.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र





# उत्तम आरोग्य, ग्रंथ वाचन, सुसंवाद ही आंनदी आयुष्याची त्रिसूत्री - मंत्री भुजबळ

## श्री. स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ सभामंडप लोकर्पण





















नाशिक । ज्येष्ठ नागरिक होणे हा आयुष्याचा एक महत्वाचा टप्पा असून उत्तम आरोग्य, ग्रंथ वाचन व सुसंवाद या त्रिसूत्रीचा अंगिकार केल्यास आपण आनंदी आयुष्य जगू शकतो असे आवाहन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले. श्री. स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ सभामंडप लोकर्पणप्रसंगी मंत्री छगन भुजबळ बोलत होते. यावेळी प्रांत अधिकारी बाबासाहेब गाढवे, तहसीलदार आबा महाजन, येवला नगरपालिकेचे मुख्याधिकारी किरण देशमुख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अभिजित शेलार, येवला विधानसभा अध्यक्ष वसंत पवार, ड.बाबासाहेब देशमुख, माजी नगराध्यक्ष भोलानाथ लोणारी, माजी जिल्हा परिषद सदस्य महेंद्र काले, शहराध्यक्ष दिपक लोणारी, गोविंदराव खराटे, संतोष खैरनार, भाऊसाहेब धनवटे, सुभाष गांगुर्डे, गोटू मांजरे, मलिक मेंबर यांच्यासह श्री. स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते. मंत्री छगन भुजबळ यावेळी म्हणाले, वयाची साठी ओलांडल्यानंतर मनुष्यास ज्येष्ठत्व येते. वयाच्या या वळणावर प्रत्येकाने आपल्या दैनंदिन आयुष्यात योग्य बदल करून घेतले पाहीजेत. उत्तम आरोग्य हिच आपली संपत्ती आहे. यासाठी नियमित फिरणे, व्यायाम करणे, योगा करणे आणि आहारात आवश्यक बदल करणे हे तितकेच महत्वाचे आहे. चांगले ग्रंथ, पुस्तके, वर्तमानपत्र वाचन करणे, वयानुरूप खेळ खेळणे, मनोरंजनात्मक छंद जोपासणे हे गरजेचे असून यातून जगण्याची नवी दिशा मिळते. श्री. स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघातील सदस्य नागरिक येथे एकत्र येतात, एकमेकांशी संवाद साधतात यातून सुख-दु:ख, एकमेकांचे विचार यांची देवाणघेवाण होते. यामुळे मन मोकळे होवून प्रफुल्लीत राहते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भोलानाथ लोणारी यांनी केले.